**नि.फौ.ख.क्र. १११/२०१६**
सरकार – वि.- दिनेश कसबे
**निशाणी क्र. २८**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ -**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – अशोक लालासाहेब पायाळ - पंच
वय – ३५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
सध्या रा. - ताडीवाला रोड, पुणे.

**फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. एस. काळे यांचे मार्फत सुरु-**

दि. ०८/०५/२०१६ रोजी मला पोलीसांनी पंचनामाकामी रेल्वे स्टेशनला बोलावले होते. त्यावेळी त्यांच्या ताब्यात दिनेश कसबे नावाचा एक व्यक्ती होता. त्यास रेसुबच्या कर्मचा-यांनी पकडुन आणलेले होते. त्यावेळी फिर्यादी देखील तेथे होता, परंतु त्याचे नाव मला आठवत नाही. पोलीसांनी आरोपीच अंगझडती घेतली, परंतु त्याच्याकडे काही मिळुन आले नाही. पोलीसांनी त्यास अटक करुन पंचनामा तयार केला व माझी सही घेतली. आता मला अटक पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी, दुसरा पंच व पोलीस वाघमारे यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २९** देण्यात येतो. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण .**

**आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

दि. ०२/०७/२०२६
स्थळ - पुणे

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.07.02 17:16:09 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.